राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३८०८ / २०२४ / सातारा

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रकाश रामचंद्र चव्हाण | निवासी नायब तहसिलदार तहसिल कार्यालय सातारा, जि. सातारा | तहसिलदार, तहसिल कार्यालय सातारा, जि. सातारा |

( सुनावणी दिनांक - १७ / ११ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. १९.०६.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २६.०९.२०२३ | सन १९४२ ते १९७०-७५ या कालवधीत श्री. रामराव अंतू चव्हाण हे मौजे महागांव व चिंचणेर या ठिकाणी कोतवाल म्हणून सेवा करत होते त्यांचे नेमणूकपत्र व सेवा पुस्तकाच्या साक्षांकित प्रती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. "

जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, " अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि.२४.१०.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर देवून अपिलार्थी यांनी माहिती अर्जात नियुक्ती केलेली निश्चित

दिनांक नमूद केली नसल्याने माहिती शोध घेण्यास अडचण येत असल्याने अर्जामध्ये नियुक्ती दिनांक नमूद करून फेरअर्ज सादर करावा, ती माहिती आपणास पुरवली जाईल. त्यामुळे अपिलार्थी यांचा माहिती अर्ज निकाली ठेवण्यात येत आहे, असे कळविले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून दि. २६.०३.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखाचा पुनश्चः शोध घेवून अपिलार्थी यांना वस्तुस्थितीबाबत अवगत करावे, असा आदेश पारित केला आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. २४.१०.२०२३ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेवून वस्तुस्थिती अवगत करण्याबाबत आदेश पारित केले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या प्रथम अपिलीय आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केली नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्यानुसार माहिती मिळाल्याचे दिसून येत नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय सातारा, जि. सातारा यांनी अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेल्या माहितीबाबत कार्यालयीन अभिलेखात शोध घेवून कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी ५० पृष्ठांपर्यंतची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपिलार्थीस ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय सातारा, जि. सातारा यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ३८०८ / २०२४ / सातारा 10847/2025 दिनांक - 11/12/2025